


# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक ३१०, शनिवार ३१ ऑगस्ट २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# मनमाड रस्त्यासाठी पाच वर्षात पाठपुरावा का केला नाही?

## ■ विखे पिता पुत्रांवर खा. नीलेश लंके यांचे शरसंधान ■ आपल्या पाठपुराव्यानंतर रस्त्याच्या दुरूस्तीला प्रारंभ ■ जिल्हाधिकारी कार्यालयातील विखे यांच्या बैठकीचा केवळ फार्स

नगर : विशेष प्रतिनिधी

**नगर-मनमाड रस्त्याचे काम सुरू करण्यासाठी आपण दि.२२ जुन रोजी मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेतल्यानंतर या रस्त्याच्या दुरूस्तीसाठी ८ कोटी ८४ लाख ७९ हजार ७५१ रूपये इतका निधी मंजुर झाला आहे. गडकरी यांची घेतलेली भेट, त्यांच्याशी केलेला पत्रव्यवहार, मंत्री गडकरी यांच्या मंत्रालयाकडून मंजुर झालेल्या निधीचे पत्र, पूर्वीच्या ठेकेदारास काळया यादीत टाकल्याचा आदेश आदी पत्रकार परिषदेत सादर करीत खासदार नीलेश लंके यांनी विखे पिता-पुत्रांवर नगर येथे जोरदार शरसंधान केले. पालकमंत्री विखे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात या रस्त्यासाठी घेतलेली बैठक केवळ फार्स होता. या रस्त्यासाठी पाच वर्षे पाठपुरावा का केला नाही असा सवालही लंके यांनी विखे-पिता पुत्रांचे नाव न घेता केला.**

यावेळी बोलताना लंके म्हणाले, दि.५ डिसेंबर २०२२ मध्ये आपण नगर-पाथर्डी व नगर-मनमाड या रस्त्यांच्या कामांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण केले होते. दोन्ही रस्त्यांचे काम पुर्ण करण्याचे लेखी आश्वासन त्यावेळी देण्यात आले. प्रत्यक्षात पाथर्डी रस्त्याचे काम पुर्ण झाले. मनमाड रस्त्याचे मात्र अद्यापही काम झालेले नाही. खरे तर तत्कालीन खासदारांनी हे काम पूर्ण करून घेण्यासाठी लक्ष देणे अपेक्षीत होते, मात्र तसे काही झाले नाही. गेल्या सहा वर्षांपासून हा रस्ता खोदून ठेवण्यात आला असल्याचे लंके म्हणाले.

दि.४ जुन रोजी लोकसभा निवडणूकीचा निकाल लागल्यानंतर आपण २२ जुन रोजी दिल्लीत मंत्री नितीन गडकरी यांची खा. सुप्रिया सुळे, खा. कल्याण काळे, खा. बजरंग सोनवणे यांच्यासह भेट घेतली. गेल्या सहा वर्षांपासून हा रस्ता खोदून ठेवल्याने या रस्त्यावर आतापर्यंत ५०० ते ६०० बळी गेले असल्याचे आपण गडकरी यांच्या निदर्शनास आणून दिले. या कामाच्या ठेकेदारास काळया यादीत टाकून दुसरा ठेकेदार नियुक्त करण्यासाठी वेळ जाणार असल्याने रस्त्याची तातडीने दुरूस्ती करण्याची मागणी आपण केली होती. त्याच वेळी गडकरी यांनी त्यांचे स्विय सहाययक बाबासाहेब ठेंगे यांना दुरूस्तीच्या कामाचा प्रस्ताव करण्यासंदर्भात सुचना दिल्या होत्या हे लंके यांनी यावेळी पुराव्यांसह दाखवून दिले.

पत्रकार परीषदेस अभिषेक कळमकर, प्रदीप परदेशी, बाळासाहेब बोराटे, योगीराज गाडे, विक्रम राठोड, अ‍ॅड. राहुल झावरे, रविंद्र राजदेव, प्रकाश पोटे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस, नीलेश लंके प्रतिष्ठाणचे कार्यकर्ते उपस्थित होते.



■ नगर-मनमाड रस्त्याच्या दुरूस्तीसंदर्भातील वस्तुस्थिती खासदार नीलेश लंके यांनी पुराव्यांसह पत्रकार परिषदेत सादर केली.

### रस्ता दुरूस्तीसाठी जयहिंद एजन्सी

आपल्या मागणीनंतर मंत्री गडकरी यांनी दिलेल्या निर्देशानुसार दि.१० जुलै रोजी या रस्त्याच्या दुरूस्तीसाठी टेंडर काढण्यात आले. वाशी, नवी मुंबई येथील जयहिंद रोड बिल्डर्स या एजन्सीची रस्ता दुरूस्तीसाठी नियुक्ती करण्यात आली. या एजन्सीने काम सुरू केल्यानंतर ते निकृष्ठ असल्याचे लक्षात आल्यानंतर ठेकेदारास दर्जेदार काम करण्यासंदर्भात तंबी देण्यात आल्याचेही खा. लंके म्हणाले.

### निवडणूक डोळयापुढे ठेऊन बैठकीचा फार्स

या रस्त्याच्या कामावरून गेल्या आठ दिवसांपासून राजकारण सुरू आहे. कृती समितीची बैठक बोलविण्यात आली यात दुमत नाही. पाठपुरावा झालाच पाहिजे मात्र केवळ प्रसिध्दीसाठी फार्स करणे योग्य नाही. इतके दिवस असा पाठपुरावा का झाला नाही ? आता जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक घेऊन दिशाभुल करण्यात येत आहे. या बैठकीत जे दाखविले गेले ते पुर्णतः चुकीचे आहे. निवडणूका डोळयापुढे ठेऊन असा फार्स करणे योग्य नसल्याचा टोला खा. लंके यांनी लगावला.

### जुना ठेकेदार काळया यादीत

आपल्या मागणीनुसार मनमाड रस्त्याचे काम करणाऱ्या पूर्वीच्या ठेकेदारास दि.२३ जुलै रोजी काळया यादीत टाकण्यात आले. त्यानंतर या रस्त्याच्या कामासाठी औरंगाबाद येथील एजन्सी नियुक्त करण्यात आली असून काही भागात काँक्रीटचा रस्ता घेण्यासंदर्भातही आपण मंत्री गडकरी यांना पत्र पाठविले असल्याचे लंके यांनी सांगितले.

### राजीनाम्याच्या तयारीनंतर उत्तरच नाही !

पूर्वी नगर-मनमाड रस्त्याच्या ठेकेदाराकडून खंडणी मागण्यात आल्याचा आरोप मा. खा. डॉ. सुजय विखे यांनी केला होता. त्याबाबत पत्रकारांनी विचारले असता त्याच वेळी आपण स्वतः राजीनामा देण्याची तयारी दर्शविली होती. मात्र त्यानंतर उत्तर आलेच नाही. हा रस्ता केंद्र शासनाच्या आखत्यारीत आहे. त्यामुळे त्यावेळी आपला आणि प्राजक्त तनपुरे यांचा त्याच्याशी काही संबंध येण्याचे काहीच कारण नव्हते. तो रस्ता मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेचा असता तर त्यास आम्ही दोघे जबाबदार ठरलो असतो असे स्पष्टीकरण खा. लंके यांनी दिले.

### जिल्ह्यातील सर्वात मोठी दहीहंडी

नीलेश लंके प्रतिष्ठानच्या वतीने नगर शहरात शनिवार दि.३१ रोजी जिल्ह्यातील सर्वात मोठया दहीहंडीचे आयोजन करण्यात आले आहे. नऊ थरांच्या या दहीहंडीसाठी ३३ लाख ३३ हजार ३३३ रूपयांचे बक्षिस ठेवण्यात आले असून कालीचरण महाराज हे यावेळी उपस्थित राहणार आहेत. महाराजांचे यावेळी शिवतांडव नृत्यही होणार आहे. मा. नगरसेवक प्रदिपभैय्या परदेशी यांनी या दहीहंडीचे नियोजन केले असल्याचे खा. लंके यांनी सांगितले. या कार्यक्रमास नागरीकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन लंके यांनी केले आहे.

### तुम्ही अकार्यक्षम

आम्ही काम करणारे आहोत. तुम्ही कार्यक्षम होते तर यापूर्वीच या रस्त्याचे काम का झाले नाही ? उपोषण करून जसा नगर-पाथर्डी रस्त्याचे काम आपण पुर्ण करून घेतले तसे तुमचाच रस्ता होता तो पुर्ण का करून घेतला नाही. कारण तुम्ही अकार्यक्षम होता हेच त्यातून ध्वनीत होत असल्याची टीकाही लंके यांनी केली. सहा सात वर्षात मनमाड रस्त्यासाठी त्यांच्याकडून काहीच झाले नाही. ज्याप्रमाणे पाथर्डी रस्त्याचे काम सुरू होऊन ते पुर्ण झाले तसेच मनमाड रस्त्याचेही नारळ फुटल्यानंतर ते संपेपर्यंत थांबणार नाही असा विश्वासही लंके यांनी व्यक्त केला.

### एक्साईडमधील कामगारांचा प्रश्न मार्गी

एक्साईड कंपनीमधील साठ ते सत्तर स्थानिक कामगारांना कामावरून काढून टाकण्यात आले होते. कामगारांच्या तक्रारीनंतर प्रकल्पाचे प्रमुख तसेच कामगार आयुक्त यांची संयुक्त बैठक आयोजित करून कामगारांना कामावर घेण्याच्या सुचना देण्यात आल्या. आठ तासांपेक्षा अधिक काम करणाऱ्या कामगारांना अधिकचा लाभ देण्यात येत नव्हता.२६ दिवस भरल्याशिवाय अधिकचा लाभ नाही अशी भूमिका व्यवस्थापनाने घेतली होती. वास्तविक एक दिवस जरी जास्तीचे काम केले तरी ओव्हरटाईम देणे बंधनकारक असते असे व्यवस्थापनाच्या निदर्शनास आणून देण्यात आल्यानंतर येत्या १ तारखेनंतर काही कामगारांना कामावर घेण्याची तयारी कंपनीच्या व्यवस्थापनाने दाखविल्याचे खा. लंके यांनी सांगितले.

### पालकमंत्र्यांनी १५० कोटींचा निधी दारणा प्रकल्पाकडे वळविला

मुळा उजवा कालव्याच्या दुरूस्तीसाठी आपण दि.१९ जुन रोजी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र दिले होते. या कामाचा पाठपुरावा केल्यानंतर नाबार्डकडून या कामासाठी १५० कोटी इतका निधी मंजुर करण्यात आला. या दुरूस्तीमुळे राहुरी, पाथर्डी, शेवगांव, नेवासे या तालुक्यांना फायदा होणार आहे. हा निधी मंजुर झाल्यानंतर पालकमंत्रयांनी मुंबईत बैठक घेउन मंजुर झालेला हा निधी दारणा प्रकल्पाकडे वर्ग करण्याच्या सुचना दिल्याचा गंभीर आरोप खा. लंके यांनी यावेळी केला. दरम्यान, कृष्णा खोऱ्यासाठीही १९२ कोटींचा निधी मंजुर झाला असून त्याची येत्या दहा दिवसांत निविदा प्रक्रिया पार पडेल असेही लंके यांनी स्पष्ट केले.

### मी मॅनेज होणारा नाही !

पोलीस दलाच्या स्थानिक गुन्हे शाखेतील भ्रष्टाचाराविरोधात आंदोलन केल्यानंतर पंधरा दिवसांची मुदत संपूनही आपण काहीच भूमिका स्पष्ट केली नसल्याचे निदर्शनास आणून दिल्यानंतर लंके म्हणाले, दोन टक्के कर्मचाऱ्यांच्या तक्रारीनंतर आंदोलन करण्यात आले. पोलीस महासंचालक व पोलीस महानिरीक्षकांशी चर्चा करण्यात आली. नाशिक येथील आयपीएस दर्जाच्या अधिकाऱ्यापुढे जबाब नोंदविण्यात आले आहेत. यादरम्यान तक्रारदारांवर दबावही आणण्यात आला. मात्र जबाबामध्ये ज्यांची नावे येतील त्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई होणार हे निश्चित आहे. तक्रारदारांच्या जबाबाच्या साक्षांकीत प्रतीही मागविण्यात येणार असून विविध आंदोलने, उत्सव, सणांमुळे पोलीस यंत्रणेवर ताण असल्याने काहीसा अवधी देण्यात आला आहे. मी मॅनेज होणार नाही असे लंके यांनी ठामपणे सांगितले.

### पालिका कामगारांच्या वारसांना न्याय

महानगरपालिकेच्या कामगारांच्या वारसांना सेवेत घेण्याचा शासन निर्णय आहे. नगरच्या पालिकेमध्ये हा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित असून त्यासाठी कामगारांनी आंदोलन सुरू केले आहे. या प्रश्नासंदर्भात आंदोलक तसेच आयुक्त व उपायुक्तांशी चर्चा करून २७ ते २८ कामगारांचा प्रश्न मार्गी लावण्याचे लेखी आश्वासन देण्यात आल्याचे खा. लंके यांनी सांगितले. सातव्या वेतन आयोगाच्या मागणीसाठीही उपोषण करण्यात येत असून हा प्रश्न मुख्यमंत्री स्तरावर सोडविला जाउ शकतो. सातव्या वेतन आयोगासाठीही मुख्यमंत्र्यांकडे पाठपुरावा करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.




### भिंगारच्या प्रश्नांसाठी समिती स्थापणार

भिंगार छावनी मंडळाच्या हद्दीमध्ये अनेक नागरी समस्या आहेत. या समस्यांचा आढावा घेणारा मी पहिला लोकप्रतिनिधी असल्याचे लंके म्हणाले. ड्रेनेजचा प्रश्न असल्याने या भागात आरोग्याचे प्रश्न निर्माण झालेले आहेत. शासकीय रूग्णालयात औषधे उपलब्ध नाहीत. विविध समस्यांबाबत छावनी मंडळाचे मुख्याधिकारी तसेच लष्कराचे ब्रिगेडीयर यांची बैठक घेण्यात आली. या बैठकीत विविध प्रश्नांवर सकारात्मक चर्चा करण्यात आली. गेल्या ५० वर्षांपासून नागरीकांच्या नावावर त्यांची घरेही नाहीत. समस्या मार्गी लावण्यासाठी ब्रिगेडीयर, मुख्याधिकारी, नगरसेवक यांची संयुक्त समिती स्थापन्यात येणार असून विकास आराखडा तयार करून विकास कामांसाठी केंद्र सरकारकडून शंभर ते दोनशे कोटींचा निधी उपलब्ध करण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला. या परीसरात अतिक्रमणांचेही प्रश्न असून नगर महानगरपालीका की छावनी मंडळ या प्रश्नामुळे विकासाकडे दुर्लक्ष होत आहे. औरंगाबाद, पुणे येथेही छावनी मंडळे आहेत तिथे मात्र काहीही अडचण नसल्याचे लंके यांनी यावेळी निदर्शनास आणून दिले.



फॅशन | संसार | सौंदर्य
# सखी

## गरोदर असताना महिलांनी प्रवास करणं कितपत योग्य?

**गरोदर असताना प्रवास करणे हा एक सुंदर अनुभव असू शकतो. ज्यामुळे गर्भवती मातांना बाळाच्या जन्मापूर्वी आराम करण्याची संधी मिळते. सहलीचे आयोजन करताना, काही गोष्टी लक्षात ठेवणे आवश्यक आहे, सुरक्षितता आणि आराम प्रथम ठेवणे आवश्यक आहे. गरोदर महिलांनी अशावेळी कोणती काळजी घ्यावी याचा सल्ला डॉक्टरांकडून देण्यात आला आहे...**



- दुसऱ्या तिमाहीत प्रवास करणे सुखाचे : गर्भधारणा हा काही आजार नाही; आपण एका जीवनाला जन्म देणार आहात हे जाणून घेणे ही सर्वात सुंदर भावना आहे. म्हणून, तुम्ही गरोदर असताना प्रवास करू शकता जोपर्यंत तुम्ही सुरक्षितपणे प्रवास करत आहात. कारण तोपर्यंत काहीच त्रास नाही. सर्वसाधारणपणे, जर तुम्ही गरोदर असाल आणि तुमच्या गरोदरपणात कोणतीही गुंतागुंत नसेल असे गृहीत धरले तर तुमच्यासाठी प्रवास करण्याचा सर्वोत्तम काळ म्हणजे दुसऱ्या तिमाहीत. जर तुम्ही गरोदर असाल आणि तुम्हाला प्रवास करायचा असेल तर तुमच्या डॉक्टरांचा सल्ला घ्या, खासकरून जर तुमची गर्भधारणा जास्त धोका असेल.
- प्रवासापूर्वी डॉक्टरांचा सल्ला : गरोदर असताना कोणताही प्रवास सुरू करण्यापूर्वी, तुमच्या डॉक्टरांशी संपर्क साधा. ते तुमच्या सामान्य आरोग्याचे मूल्यांकन करू शकतात आणि तुम्ही सुरक्षितपणे प्रवास करावा की नाही याबद्दल सल्ला देऊ शकतात. तुमचे डॉक्टर तुमच्या विशिष्ट गरजांवर आधारित गोष्टी किंवा मर्यादा सुचवू शकतात आणि त्याप्रमाणे तुम्हाला काळजी घेण्यासाठी सल्ले देऊ शकतात.
- योग्य स्थान निवडा : वैद्यकीय सेवांसाठी सोयीस्कर प्रवेश असलेली आणि गर्भवती महिलांसाठी योग्य असलेली ठिकाणे निवडा. स्थानिक आजार असलेल्या किंवा गर्भधारणेदरम्यान सल्ला दिला जात नसलेल्या लसीकरणाची मागणी यांसारख्या आरोग्यासाठी महत्त्वपूर्ण धोके असलेली ठिकाणे टाळा. जिथे जाणार असाल तिथे तुम्ही सर्व व्यवस्था आहेत की नाही याची खात्री करून घ्या.
- वेळ महत्वाची : तुमच्या सुट्टीच्या वेळापत्रकाची काळजीपूर्वक योजना करा. सकाळची मळमळ कमी होत असल्याने आणि गुंतागुंत होण्याची शक्यता कमी असल्याने, अनेक स्त्रियांना असे आढळते की दुसरा त्रैमासिक अर्थात Second Trimester (आठवडे 14-27) प्रवासासाठी सर्वात आरामदायक कालावधी आहे.
- योग्य गाडी निवडण्याची गरज : तुम्ही कार, ट्रेन, बोट किंवा अन्य वाहतूक वाहनांचा वापर करत असल्यावर तुमच्या आरामदायी वाहतुकीची योजना करणे गरजेचे आहे. हवेशीर, सैल-फिटिंग कपडे घाला आणि अधिक लेगरूम असलेली सीट निवडा. लांब फ्लाइट किंवा राइडवर, वारंवार ब्रेक घेतल्याने थकवा कमी होण्यास मदत होते.
- औषधे विसरू नका : विटामिन्स, आवश्यक औषधे, आरामदायक शूज आणि ऊर्जा टिकवून ठेवणारे स्नॅक्स हे सर्व एका लहान पिशवीत पॅक केले पाहिजेत. तुमच्या गर्भधारणेच्या वैद्यकीय नोंदी आणि आपत्कालीन संपर्कांची यादी आणण्याचे लक्षात ठेवा. कधीही कोणतीही आपात्कालीन गोष्ट उद्भवल्यास औषधे जवळ असावीत.
- हायड्रेटेड राहा आणि पौष्टिक जेवण घ्या : प्रवास करताना हायड्रेटेड राहण्यासाठी भरपूर पाणी प्या आणि निरोगी, पचायला सोपे जेवण आणि स्नॅक्स निवडा. छातीत जळजळ किंवा अपचन होऊ शकते अशा गोष्टी टाळा आणि कॅफिनचे सेवन मर्यादित करा. सहसा कॅफिन पिणे टाळाच.

### शारीरिक हालचाली

प्रवास करताना, विशेषतः लांब उड्डाणांवर किंवा वाहनांच्या राइडवर, आपले पाय ताणण्यासाठी थोडी विश्रांती घ्या आणि थोडी ताजी हवा घ्या. रक्ताच्या गुठळ्या टाळण्यासाठी आणि घोट्याचा आणि पायाची सूज न येण्यासाठी पायांची हालचाल होणे महत्त्वाचे आहे. त्यानुसारच प्रवास करा. तुमच्या संपूर्ण प्रवासात, तुम्हाला कसे वाटते याकडे बारकाईने लक्ष द्या. तुम्हाला कोणतीही अनपेक्षित वेदना, अस्वस्थता किंवा इतर चिंताजनक लक्षणे जाणवल्यास तत्काळ वैद्यकीय मदत घ्या. कर्मचारी किंवा इतर प्रवाशांकडून मदत मागायला घाबरू नका.

### या गोष्टी ठेवा लक्षात

अनपेक्षित वैद्यकीय खर्चाचा समावेश असलेला प्रवास विमा घेण्याचा विचार करा. हा एक प्रतिबंधात्मक उपाय आहे जो आपण घरापासून दूर असताना आपत्कालीन परिस्थितीत आपल्याला योग्य काळजी मिळेल याची हमी देतो. तुमच्या प्रवासापूर्वी तुम्ही जिथे जाणार आहात तेथे उपलब्ध असलेल्या वैद्यकीय सेवांची तपासणी करा. तुम्हाला वैद्यकीय मदतीची आवश्यकता असल्यास जवळच्या रुग्णालये आणि दवाखान्यांचे पत्ते आणि फोन नंबर सेव्ह करा. काळजीपूर्वक नियोजन आणि आपल्या आरोग्य आणि आरामाकडे लक्ष देऊन, गरोदर असताना प्रवास करणे हा एक मजेदार आणि संस्मरणीय अनुभव असू शकतो. सुरक्षित आणि आनंददायी प्रवास सुनिश्चित करण्यासाठी, तुमच्या डॉक्टरांचा सल्ला घ्या, योग्य ठिकाणे निवडा आणि खबरदारी घ्या. तुमच्या स्वतःच्या आणि तुमच्या बाळाच्या आरोग्याला प्राधान्य देताना सुंदर आठवणी बनवू शकता. सुरक्षित प्रवास करा!



## घरातून एकट्या बाहेर पडताय?

### सेफ्टी टूल्सची मदत घ्या


बाहेर पडताना तुमच्यासोबत कायम काही सेफ्टी टूल्स बाळगा. पेपर स्प्रे, नेल फायरल, सेफ्टी पिन, बेल्ट यांचा तुम्ही गरज पडल्यास वापर करू शकता. त्याचप्रमाणे तुमचा दुप्पटा किंवा कमरेचा बेल्टही तुम्ही वापरू शकता.

**अलिकडे प्रत्येक क्षेत्रात महिला आघाडीवर असल्या तरी महिलांसाठी असलेला धोका आजही कायम आहेत. आजही अनेक ठिकाणी महिला असुरक्षित आहेत. कॉलेजमधील तरुणी असो किंवा नोकरी करणाऱ्या महिला आणि गृहिणी अनेकांना घरातून बाहेर पडताना चिंता सतावते. शिक्षण आणि नोकरीच्या निमित्ताने अनेकजणी कुटुंब आणि घरापासून दूर राहत असतात. अशावेळी असुरक्षिततेची भावना कायमच सतावत असते. अनेक ठिकाणी खास करून संध्याकाळनंतर महिलांना घराबाहेर पडणंही मुश्किल आहे. अशात महिलांनी काही गोष्टी ध्यानात घेणं गरजेचं आहे...**

- बेस्ट फ्रेंड फोनची अशी घ्या मदत : कायम तुमच्यासोबत असणारा फोन तुम्ही एकट्या असताना योग्य प्रकारे वापरणं गरजेचं आहे. रात्रीच्यावेळी तुम्ही एकट्या प्रवास करत असाल तर सर्वप्रथम तुमच्या मोबाईलमधील जीपीएस लोकेशन ऑन करा. शक्य असल्यास घरं गाठेपर्यंत तुमचं लाईव्ह लोकेशन घरातील एखाद्या सदस्याला किंवा जवळील मित्र-मैत्रिणीला शेअर करा. कॅब किंवा ऑटोरिक्षाचा नंबरही शेअर करा. याशिवाय तुम्ही घरी पोहचेपर्यंत घरातील एखाद्या व्यक्तीसोबत किंवा मैत्रिणीसोबत फोनवर बोलत रहा. यामुळे तुम्हालाही सुरक्षित वाटेल.
- महत्त्वाचे नंबर सेव्ह करणे : यासोबतच तुमच्या मोबाईलमध्ये कुटुंबातील किंवा मित्र परिवारातील महत्वाचे नंबर सेव्ह असणं गरजेचं आहे. ज्या व्यक्ती तुमचा फोन कधीही उचलतील याचा तुम्हाला विश्वास असेल असे महत्वाचे नंबर सुरुवातीलाच दिसतील असे सेव्ह करावे. जेणे करून तुम्हाला डायल करण्यासाठी ते लगेचच सापडतील. याशिवाय पोलिस हेल्पलाईन नंबर १००, ११२ आणि महिला हेल्पलाईन नंबर १०९१ हे कायम स्पेशल डायलमध्ये सेव्ह असावे. यासोबतच महत्वाची गोष्ट म्हणजे मोबाईल कायम चार्ज असले याची दखल घ्यावी. अगदी कमी बॅटरी असताना प्रवासासाठी बाहेर निघण्याची जोखीम टाळावी.
- रस्त्यावरून चालताना ही काळजी घ्या : रस्त्याने चालत असताना कायम ट्रॅफिकच्या विरुद्ध दिशेने चाला. यामुळे समोरून येणाऱ्या गाड्या तुम्हाला दिसतील, जेणेकरून पाठीमागून हल्ला होण्याची शक्यता कमी होते. चालत असताना जवळील बॅग किंवा हॅण्डबॅगही रस्त्याच्या बाजूला न घेता भिंतीकडील बाजूला धरावी. शिवाय बॅगची पकड घट्ट असेल याची काळजी घ्यावी. कुणी तुमचा पाठलग करतेय असं लक्षात येतात लगेचच एखाद्या जवळचं घरं पाहून डोर बेल वाजवावी.
- योग्य मार्ग निवडा : रस्त्याने एकट्या प्रवास करत असताना लवकर पोहचण्यासाठी तुम्हाला माहीत नसलेला शॉर्टकट टाळावा. सुनसान रस्त्याएवजी गर्दी असलेल्या रस्त्याने जाणं योग्य. कॅब किंवा ऑटोरिक्षा ड्रायव्हर लवकर पोहचवण्यासाठी नवा मार्ग घेण्यासंबंधी विचारत असल्यास ते टाळावं. नेहमीच्याच रस्त्याने जावं. तसंच अंधार असलेले रस्ते टाळावे.
- ड्राइव्ह कराताना घ्या ही काळजी : जर तुम्ही एकट्या गाडी चालवणार असाल तर गाडीच्या खिडक्या कायम बंद ठेवाव्यात. फोन कॉल किंवा म्युझिकमध्ये जास्त रमून जाण्यापेक्षा सतर्क रहा. गाडी एखाद्या बेसमेंटमध्ये पार्क करताना विशेष खबरदारी घ्यावी. गाडीतही कायम काही सेफ्टी टूल्स ठेवावे.
- हल्ला रोखण्यासाठी कायम तयार रहा : एकट्या प्रवास करणाऱ्या महिलांनी दक्ष राहणं जितकं गरजेचं आहे, तितकंच एखादा हल्ला झाल्यास स्वतःच रक्षण करण्यासाठीही तयार रहाणं गरजेचं आहे. हल्ला झाल्यास मदतीसाठी जोरात आरडओरड करा. कुणी पाठलाग करत असल्यास लवकरात लवकर किंवा पळ काढून एखादं गर्दीचं ठिकाण गाठा. यावेळी न थांबता चपळाईने पोलिस किंवा जवळच्या व्यक्तीला फोन करा. याशिवाय ज्या महिला नोकरीवरून उशीरा घरी परततात किंवा ज्यांना उशीरा एकट्याने प्रवास करावा लागतो. त्यांनी सोने, चांदी किंवा डायमंटचे महागडे दागिने घालणं टाळावं. या शिवाय इतही महागड्या वस्तू वापरताना काळजी घ्यावी. जसं की फोन, घड्याळ. कारण अनेकदा चोरीच्या उद्देशाने गुन्हेगार अनेक महिलांवर पाळत ठेवून असतात. तसंच पाळत ठेवून राहणाऱ्यांपासून वाचण्यासाठी कायम तुम्ही खूप स्ट्राँग आहात हे दाखवा. कारण गुन्हेगार हे कायम कमजोर आणि घाबरट महिलांना टार्गेट करतात.

### पार्टीत ही काळजी घ्या...

जर तुम्ही एखाद्या पार्टीसाठी रात्री उशिरापर्यंत थांबणार असाल तर काही गोष्टींची खबरदारी घेणं गरजेचं आहे. जसं की पार्टीत तुमच्या जवळच्या व्यक्तींसोबतच कायम रहा. इतर व्यक्तींच्या हालचालींकडे लक्ष ठेवा. पार्टीतून शक्यतो घरी एकटे परतू नका. अशावेळी मित्र-मैत्रिणींसोबतच निघून कुणी घरी सोडेल हे सुनिश्चित करा. तसंच पार्टीत दारू किंवा इतर नशेच्या पदार्थांचं सेवन करू नका. जर तुम्ही एकटे एखाद्या पार्टीत जात असाल तर शक्य असेल त्या जवळच्या व्यक्तीला त्याबद्दलची कल्पना देऊन ठेवा. जसं की पार्टीचं ठिकाणी, ती कुणाची पार्टी आहे आणि वेळेसंबंधी कल्पना द्या.



## आला ‘सनस्क्रीन’चा मोसम!

**उन्हाळा म्हणजे रोजच्या मेकअप उत्पादनांमध्ये सनस्क्रीन आवर्जून समाविष्ट करण्याचा काळ. सनस्क्रीन वेगवेगळ्या प्रकारांत मिळतं. क्रीम, लोशन, कॉम्पॅक्टसारखी पावडर हे प्रकार तर आपल्या परिचयाचे आहेतच, पण क्वचित तेलासारखं पातळ द्रव्य किंवा अगदी स्प्रेच्या स्वरूपातही वेगवेगळ्या ब्रँडस् चं सनस्क्रीन बाजारात उपलब्ध आहे. उन्हाळ्यासाठी सनस्क्रीन खरेदी करण्यापूर्वी सनस्क्रीन नेमकं का लावतात आणि त्याचा चांगला उपयोग व्हावा यासाठी काय करावं, यासंबंधीच्या काही टिप्स पाहू या...**




### सनस्क्रीन का लावतात ?

ढोबळमानानं सांगायचं तर सूर्यकिरणांमध्ये ‘यूव्हीए’ आणि ‘यूव्हीबी’ अशी दोन प्रकारची अतीनील (अल्ट्राव्हायोलेट) किरणं असतात. यातल्या ‘यूव्हीबी’ किरणांची तरंगलांबी ‘यूव्हीए’पेक्षा कमी असते आणि त्यामुळे ‘यूव्हीबी’ किरणांमुळे होणारं त्वचेच्या वरच्या थराला- म्हणजे ‘एपिडर्मिस’ला नुकसान पोहोचतं. ‘यूव्हीए’ किरणांची तरंगलांबी जास्त असल्यामुळे ती त्वचेत खोलवर जाऊन नुकसान करू शकतात. खूप वेळ कडक उन्हात वावरल्यामुळे त्वचेच्या वरच्या थरात त्वचेचा पोत बिघडणं, ‘सनबर्न’ होणं, या तक्रारी उद्भवताताच, पण आतल्या थरांमध्ये जाऊन नुकसान करणाऱ्या अतीनील किरणांमुळे त्वचेवर सुरकुत्या पडणं, त्वचा अकाली म्हातारी होणं, त्वचेवर काळे डाग पडणं अशा समस्याही उद्भवू शकतात. अतीनील किरणं त्वचेतील जनुकांमध्ये बदल घडवण्याच्या प्रक्रियेस चालना देऊन त्वचेच्या कर्करोगासाठीही कारणीभूत ठरत असल्याचं मानलं जातं. या गोष्टींना आळा बसावा यासाठी अधिक काळ उन्हात फिरायचं असेल तर सनस्क्रीन लावतात. परंतु खरंतर केवळ उन्हाळ्यात किंवा कडक ऊन असतानाच नव्हे, तर नेहमीच बाहेर जाताना चांगल्या दर्जाचं सनस्क्रीन वापरल्यास चांगलं, असं सांगितलं जातं.

### सनस्क्रीनचा ‘एसपीएफ’ जितका अधिक, तेवढं सन प्रोटेक्शन जास्त

या दिवसांत सतत घाम येत असल्यामुळे तुम्ही खूप वेळ उन्हात फिरणार असाल, तर ‘वॉटर रेझिस्टंट सनस्क्रीन’ चांगलं. वॉटर रेझिस्टंट सनस्क्रीन साधारणपणे दोन तास त्वचेवर टिकतं. त्यानंतर लागेल तसं ते पुन्हा लावावं. सनस्क्रीनमध्येसुद्धा त्वचेच्या प्रकारानुसार वेगवेगळे प्रकार मिळतात. म्हणजे तुमची त्वचा जर तेलकट असेल, तर ‘लाईटवेट’ आणि ‘ऑईल फ्री’ लिहिलेलं सनस्क्रीन वापरा. त्वचा कोरडी असेल, तर ज्या सनस्क्रीनमध्ये ग्लिसरिन वा ‘हायाल्युरॉनिक ॲसिड’ आहे, असं सनस्क्रीन चांगलं ठरेल. खूप संवेदनशील असलेल्या त्वचेसाठी ‘झिंक



ऑक्साईड’ वा ‘टायटॅनियम डायॉक्साईड’ असलेलं गंधरहित सनस्क्रीन वापरायला सांगितलं जातं. बऱ्याचदा ‘स्किन टाईप’ सनस्क्रीनच्या बाटलीवर छापलेला असतोच, तो तपासून घेतल्यास योग्य सनस्क्रीन निवडणं सोपं होईल.

### खरेदी व वापरापूर्वी या काही टिप्स लक्षात ठेवा...

या दिवसांत रोज बाहेर पडताना आठवणीनं सनस्क्रीन लावाच, पण सनस्क्रीनची एखादी लहान बाटली पर्समध्ये कायम बरोबर बाळगा. सनस्क्रीन एका वेळी भारंभार लावावं लागत नाही. एका बोटाच्या अग्रावर अर्थात ‘फिंगरटिप’वर सनस्क्रीन घेऊन तेवढंच नीट पसरून लावलेलं पुरतं. चेहरा,



गळा, मान वा हातांवर खूप घाम येत असतो. घाम वारंवार पुसताना किंवा चेहरा धुतल्यावर सनस्क्रीन निघून जातं. त्यामुळे लागेल तसं सनस्क्रीन पुन्हा लावायला हवं. बहुतेक लोक चेहऱ्यावर मॉईश्चरायझर, फाऊंडेशन वगैरे विविध प्रॉडक्टस् वापरत असतात. अशा वेळी सनस्क्रीनचा थर सर्वांत शेवटचा असू द्या. चेहऱ्यावर वापरायच्या विविध उत्पादनांमध्ये ‘एसपीएफ’ अर्थात ‘सन प्रोटेक्शन’ असतं. या प्रॉडक्टस्च्या बाटली वा ट्यूबवर तुम्हाला ‘एसपीएफ १५’, ‘एसपीएफ ३०’ असा काही तरी आकडा लिहिलेला सापडेल. मग ही उत्पादनं लावून भागेल का? आणि वेगळं सनस्क्रीन लावण्याची गरज आहे का? असा अनेकांचा प्रश्न असतो. मात्र स्किन केअर तज्ज्ञांच्या मते अशा इतर उत्पादनांपेक्षा कडक उन्हात ‘डेडिकेटेड ब्रॉड स्पेक्ट्रम सनस्क्रीन’चा अधिक चांगला उपयोग होतो.

## शॉर्ट न्यूज

### लाडक्या बहिणीला भीक नको संरक्षण हवे

**कोपरगाव :** महाराष्ट्रात शाळकरी विद्यार्थिनीपासून ते महिलांना सुरक्षिततेची हमी देण्याच्या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या (शरद पवार गट) वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर आक्रोश मोर्चा काढण्यात आला. मोठ्या संख्येने सहभागी झालेल्या महिला व युवतींनी जोरदार निदर्शने करून राज्य सरकारचा निषेध नोंदविला. भीक नको, संरक्षण हवे ! च्या घोषणांनी परिसर दणाणून निघाला. राष्ट्रवादी काँग्रेस ओबीसी सेलच्या प्रदेश सचिव (संघटक) विद्या गाडेकर यांच्या नेतृत्वाखाली मोर्चा काढण्यात आला होता.

### निवडणुकीत नेत्यांना फिरु देणार नाही

**श्रीगोंदा :** आगामी विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर नगर, श्रीगोंदा तालुक्यातील ३५ गावांचा जिव्हाळ्याचा प्रश्न असलेल्या साकळाई योजनेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. साकळाई योजनेसाठी पाणी उपलब्धतेचे प्रमाणपत्र तातडीने देऊन योजना मंजूर करण्यात यावी अशी मागणी आंदोलन कर्त्यांनी केली. दरम्यान विधानसभा निवडणुकीच्या अगोदर साकळाई योजना मंजूर न झाल्यास नेत्यांना मतदारसंघात फिरु देणार नसत्याचा इशारा साकळाई कृती समितीचे अध्यक्ष बाबा महाराज झेंडे यांनी दिला.

### जामखेड शहराने पाळला कडकडीत बंद

**जामखेड :** प्रारूप विकास आराखडा बचाव कृती समितीच्या वतीने ''चला जामखेड वाचवू या '' या टॅगलाईन खाली अन्यायकारक प्रारूप विकास आराखडा हाणून पाडा म्हणत विकास आराखडा बचाव कृती समितीच्या वतीने आज जामखेड बंदचे आवाहन करण्यात आले होते याला शहरातील व्यापारी व नागरिकांनी जामखेड शहर कडकडीत बंद ठेवत प्रारूप विकास आराखडा बचाव कृती समितीला पाठिंबा दिला आहे. यावेळी बोलताना उद्योजक आकाश बाफना म्हणाले की, आज व्यापारी व नागरिकांनी उत्स्फूर्त पणे दुकाने बंद ठेवून पाठिंबा दिला

### शेतकऱ्यांनी कर्जमाफीचा आदेश दिला परत

**कर्जत :** सरकारने कर्जमाफी दिली, मात्र तो कर्जमाफीचा धनादेश शेतकऱ्यांनी बँकेला परत दिला. सरकारने दिलेली कर्जमाफी बँकेला परत करत यशोदा मैया पतसंस्थेचे नारायण जगताप यांनी पुनरुज्जीवन केले. सरकारने शेतकऱ्यांना कर्जमाफी दिली. मात्र, ही कर्जमाफी मला नको आहे. कारण या कर्जमाफीची आवश्यकता मला नाही मी तेवढा सक्षम आहे असे म्हणत राशीन येथील सामाजिक कार्यकर्ते व व्यावसायिक उद्योजक नारायण जगताप यांनी युनियन बँकेला दोन लाख ७५ हजार रुपयांचे कर्जमाफीचे धनादेश शाखा व्यवस्थापक पवार यांच्याकडे परत दिले.

# शिर्डीत व्हाईस ऑफ मीडियाचे शनिवारी शिखर राज्यस्तरीय अधिवेशन

## शिर्डीच्या पावनभूमीत भरणार दोन दिवस पत्रकारांचा मेळा




**संगमनेर : प्रतिनिधी**

**आंतरराष्ट्रीय स्तरावरील पत्रकारांची एकमेव संघटना असलेल्या व्हाईस ऑफ मीडियाचे २ दिवसीय राज्यस्तरीय शिखर अधिवेशन शिर्डी येथील साईबाबांच्या पावन भूमीत शनिवार दि.३१ ऑगस्ट व रविवार दि.१ सप्टेंबरला होत असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष गोरक्षनाथ मदने यांनी दिली.**

शिर्डी येथील साई पालखी निवारा या ठिकाणी होणाऱ्या दोन दिवसीय व्हाईस ऑफ मीडियाच्या शिखर अधिवेशनाचे उद्घाटन विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांच्या हस्ते तसेच महसूल तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्या अध्यक्षतेखाली तर आदिवासी विकास मंत्री विजयकुमार गावित, विधान परिषद सदस्य आ. सत्यजित तांबे, माजी खासदार हेमंत पाटील, मालपाणी उद्योग समूहाचे संचालक डॉ.संजय मालपाणी व नंदुरबार जिल्हा परिषद बांधकाम समितीचे सभापती हेमलता शितोळे ,भाजप युवा मोर्चाचे अध्यक्ष विक्रम पाचपुते अतिथी उपस्थित राहणार आहेत.

व्हाईस ऑफ मीडिया राष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे, राष्ट्रीय सरचिटणीस चंद्रमोहन पोपला , राष्ट्रीय कार्याध्यक्ष संजय आवटे , राष्ट्रीय उपाध्यक्ष मंदार फणसे, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष अनिल मस्के , महाराष्ट्र कार्याध्यक्ष योगेंद्र दोरकर,राज्य उपाध्यक्ष अजित कुंकूलोळ आदी मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत अधिवेशन होणार आहे.

या शिखर अधिवेशनात दै . लोकमतचे समूह संपादक विजय बाविस्कर ,ज्येष्ठ पत्रकार व विचारवंत भाऊ तोरसेकर ,ज्येष्ठ पत्रकार अशोक वानखेडे , ज्येष्ठ संपादक तुळशीदास भोईटे, महिला संपादक श्रीमती सरिता कौशिक यांना आंतरराष्ट्रीय ख्यातीचे ज्येष्ठ शिल्पकार चित्रकार प्रमोद कांबळे यांच्या हस्ते जीवन गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.यावेळी सर्व पुरस्कार प्राप्त संपादकांची मुलाखत ज्येष्ठ पत्रकार प्रसन्न जोशी आणि विधान परिषद सदस्य आमदार सत्यजित तांबे हे घेणार आहे

आम्ही घेतोय पत्रकार आणि त्यांच्या कुटुंबियांच्या आरोग्याची काळजी या विषयावरती आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्र समिती प्रमुख ओमप्रकाश शेटे,आरोग्य सहाय्यता निधी मंत्रालय कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक हे सहभागी होऊन पत्रकारांना मार्गदर्शन करणार आहे. त्या नंतर पत्रकारांच्या आरोग्यासाठी विशेष कार्य करणाऱ्या लातूर परभणी व बार्शी या शाखांच्या पदाधिकाऱ्यांचा सन्मान करण्यात येणार आहे.माझा जिल्हा माझे व्हिजन या विषयावर सर्व जिल्हाध्यक्ष सहभागी होणार आहे अधिवेशन घेण्या मागची भूमिका आणि नियोजित कार्य प्रणाली सर्व राज्य कार्यकारिणी आणि विभाग प्रमुख सहभागी होणार आहे त्यात राष्ट्रीय अध्यक्ष सोशल मीडिया विंग गगन महोत्रा उर्दूचे राष्ट्रीय अध्यक्ष मुक्ती मोहम्मद अरुण नवी रेडिओ विंग राष्ट्रीय अध्यक्ष अमोल देशमुख आरोग्य सेलचे प्रमुख भिमेश मुतुला महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष अनिल मस्के महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष टीव्ही विंग विलास बडे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष साप्ताहिक रोहित जाधव महाराष्ट्र प्रभारी महिला विंग शेख महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रेडिओ विंग इरफान सय्यद आणि उर्दू प्रदेशाध्यक्ष मुझतबा फारूक हे या चर्चा सत्रात सहभागी होणार आहे दुसऱ्या दिवशी कोअर कमिटी प्रमुख संजय पडवळ हे ठरावाचे वाचन करणार आहे ज्येष्ठ पत्रकार विचारवंत भाऊ तोरसेकर, ज्येष्ठ संपादक प्रकाश पोहरे यांची मुलाखत प्रसन्ना जोशी घेणार आहेत संविधान वाचवण्यासाठी महिलांचा सहभाग का आवश्यक या विषयावरती गोदावरी समूहा अध्यक्ष राजश्री पाटील, माजी खासदार प्रीतम मुंडे, राष्ट्रीय प्रवक्त्या हिना गावित या मार्गदर्शन करणार आहे तसेच समारोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष नाना पटोले काँग्रेस विधिमंडळ पक्षनेते आणि वर्किंग कमिटी सदस्य आ.बाळासाहेब थोरात,आ.लहू कानडे,आ.सतीश ठाकुर ,शेतकरी नेते रविकांत तुपकर आणि शिर्डी साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्षनाथ गाडीलकर यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे .

# श्रीरामपुरात नगर परिषद कर्मचाऱ्यांचा बेमुदत संप

**श्रीरामपूर : प्रतिनिधी**

**जुनी पेन्शन योजना लागू करावी, या प्रमुख मागणीसह इतर मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य नगरपरिषद संवर्ग अधिकारी संघटना यांच्या वतीने बेमुदत संप पुकारण्यात आला. या संपात श्रीरामपूर नगर परिषद कर्मचारी यांनी सहभाग घेता आहे. त्यामुळे श्रीरामपूर पालिकेचे कामकाज विस्कळीत झाले.**



श्रीरामपूर नगर परिषदेच्या कार्यलयात गुरुवारी सकाळी संघटनेचे अध्यक्ष हेमंत कार्ले, उपाध्यक्ष राम सरगर, उपमुख्याधिकारी आयुब सय्यद, करनिरीक्षक धनंजय कविटकर, दीपक खोब्रागडे आदींनी मुख्याधिकारी सोमनाथ जाधव यांना निवेदन दिले. यावेळी स्थापत्य अभियंता सूर्यकांत गवळी, विद्युत अभियंता रावसाहेब घायवट, पाणीपुरवठा अभियंता मनोजकुमार ईश्वरकट्टी, संगणक अभियंता पुरण धांडे, अंतर्गत लेखापरीक्षक जयश्री सायखेडे आदी उपस्थित होते. निवेदनात म्हटले आहे की, महाराष्ट्र राज्य नगरपरिषद, नगरपंचयती संवर्ग अधिकारी, कर्मचारी यांचे मुलभूत प्रश्न व मागण्यांवर दुर्लक्ष होत आहे.

याबाबत महाराष्ट्र शासनाच्या अंतर्गत नगरपरिषद, नगरपंचायतीमधील सन २००५ नंतरच्या अधिकारी व कर्मचारी यांना अद्याप राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेची अंमलबजावणी केलेली नाही. जुनी पेंशन योजना बंद करण्यात आली. त्यामुळे दोन्ही कारणास्तव राज्य संवर्गातील जवळपास ३००० अधिकारी आणि स्थानिक आस्थापनेवील ६० हजारांवर वर कर्मचारी यांच्यात कमालीचा असंतोष आहे. संदर्भीय निवेदन वेळोवेळी सादर करण्यात आलेली आहेत. परंतु, अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या मुलभूत समस्या व मागण्या याबाबत शासनामार्फत दुर्लक्ष होत आहे. परंतु, नगरपरिषद, नगरपंचायतीमधील सन २००५ नंतरच्या अधिकारी व कर्मचारी यांना अद्याप कोणतीही पेंशन योजनेची अंमलबजावणी करण्यात आली नाही. शासनाने संघटनेच्या मागण्यांवर ठोस निर्णय घेतला नाही.

नगरपरिषद/नगरपंचायतीमधील अधिकारी व कर्मचारी यांच्या समस्या जुनी पेंशन योजना लागू करणे किंवा नवीन राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना अंमलबजावणी करणे. राज्य संवर्ग पदे सातवा वेतन आयोग अधिसूचनेत पदांचा समावेश करून सेवार्थ नंबर मिळणे. सहायक अनुदान एक महिना आगाऊ देणे, सातव्या वेतन आयोग फरक व मागील महागाई फरक रक्कम द्यावा, नगरपरिषद कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजना १०, २०, ३० लागू करावा, राज्य संवर्ग सर्वसाधारण बदल्यांमधील जाचक अटी वगळण्यात याव्यात, नियोजित शासकीय संघटना प्रस्तावानुसार संघटनेची नोंदणी करावी. नगरपरिषद/नगरपंचायतीमधील अधिकारी व कर्मचारी यांच्या मागण्या वेतन शासन लेखा कोषागार मार्फत कराव्यात, संवर्ग सेवेतील श्रेणी-अ पदास गट-ब (राजपत्रित) दर्जा आणि श्रेणी-ब पदास गट-ब (अराजपत्रित) दर्जा मिळावा, कर व प्रशासकीय, अग्निशामक आणि स्वच्छता निरीक्षक सेवा संवर्ग वेतनश्रेणी ४२००/-१३ करावी. सहायक आयुक्त/मुख्याधिकारी गट-ब (राजपत्रित) पदावर ६० टक्के जागा राज्य संवर्ग पदोन्नतीने भरण्यात याव्यात, आदी मागण्या करण्यात आल्या.

## वाचकांच्या लेखणीतून

# वृत्तपत्रांतील माझे स्तंभलेखन

वृत्तपत्रांमध्ये स्तंलेखनाला फार महत्त्व असते. ढोलताशे, राजधानीतून, चौफेर, प्रसंगिक, कोवळी उन्हे, राजधानीतून, क्रीडा जगत, बहुतांचे अंतरंग अशा प्रकारचे स्तंभ आपल्या वाचनात येऊन गेलेले असतात. त्या त्या वृत्तपत्राची आकर्षकता आणि वाचनीयता वाढविण्यासाठी असे स्तंभ वृत्तपत्रांमधून चालविले जातात.



१९७५ सालापासून मी महाराष्ट्र टाइम्स वृत्तपत्र वाचण्यास सुरुवात केली. त्यामधील धावते जग नावाचा स्तंभ मला फार आवडत असे. आजूबाजूस घडणाऱ्या भल्याबुऱ्या घटनांचे पडसाद आणि टीका टिप्पणी त्यात प्रकट होत असे. एक प्रकारचे ते स्फुट लेखच असत. त्यातील लेखनशैली खुसखुशीत आणि प्रभावी असे.

त्या वेळी नरसिंह राव हे भारताचे पंतप्रधान होते. मी मुंबईला नरीमन पॉईंटच्या फ्री प्रेस हाऊस बिल्डिंग मध्ये दुसऱ्या माळ्यावर बँक ऑफ इंडियात नोकरीस होतो. त्याच बिल्डिंगमध्ये नवशक्तीचे कार्यालय होते. आताही आहे.

उत्तर भारतात पंतप्रधान रावांनी एका मुस्लिम दर्ग्याला भेट दिली होती. त्याचा मोठा सटीक वृत्तान्त एका गुजराती वर्तमानपत्रात प्रकाशित झाला होता. लेखक होते अरुण शौरी. हे सूफ़ी संत फार उच्च कोटीचे होते. त्यांनी लिहिलेले ग्रंथ येथे आहेत. असे विचार पंतप्रधानांनी व्यक्त केले होते. काय होते या सूफ़ी संतांचे विचार? हिंदूंनी दिलेला प्रसाद खाऊ नका. कुत्र्याला खायला द्या. अशासारखे त्या फकीराचे विखारी विचार होते.

त्या लेखाची एक झेरॉक्स प्रत घेऊन मी नवशक्तीच्या कार्यालयात गेलो. तेथे देशपांडे नावाचे सहाय्यक संपादक की उपसंपादक होते. मी त्यांना ती झेरॉक्स प्रत दिली. हा लेख वाचून आपण नवशक्ती मध्ये एखादा लेख लिहावा, अशी विनंती केली. तुम्हीच लिहा ना. आम्ही छापू. असे ते मला म्हणाले. गावी माझी आजी वारलेली आहे. मी लिहिण्याच्या मन:स्थितीत नाही. आपणच लिहा. अशी ही त्यांना विनंती केली. नंतर दुसऱ्या की तिसऱ्या दिवशी नवशक्ति दैनिकाच्या वाहते वारे स्तंभात तत्संबंधी एक लेख प्रकाशित झाला. मला फार समाधान वाटले. ही माझ्या वृत्तपत्रीय स्तंभलेखनाची पूर्वपीठिका आहे.

मुंबईच्या लोकसत्ता दैनिकात मीही रविवारच्या किशोरकुंज पुरवणीत बालकविता स्तंभ मी वर्षभर चालविला. त्या सगळ्या बालकविता प्राण्यांची शाळा या माझ्या पुस्तकात संग्रहित आहेत.

मागे अजिंक्य भारत दैनिकाच्या अहमदनगर आवृत्तीत प्रासंगिक स्तंभातही मी लेखन केलेले आहे. शब्दज्योती, शब्दांची पालखी, बिन बैलाची गाडी, खो गया है कहीं जवाब मेरा! असे माझे सुंदर सुंदर लेख या वृत्तपत्राच्या प्रासंगिक स्तंभातून प्रकाशित झालेले आहेत. पण पुढे ही आवृत्ती बंद पडल्याने सदर स्तंभ चालविण्याचा माझा संकल्प अधुराच राहिला.

पारनेर दर्शन दैनिकाच्या वाचकांच्या लेखणीतून नामक स्तंभातून मात्र माझे स्तंभलेखन चालू आहे. ही समाधानाची बाब आहे. या स्तंभातून प्रासंगिक विषयांबरोबरच मधून मधून मी आत्मचरित्रात्मक लेखनही केले आहे. करीत राहणार आहे.

**नाना ढवळे**
८२८६९१३२२३
निघोज, ता. पारनेर,
जि. अहमदनगर.

# सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांसाठी स्पर्धा

**नगर : प्रतिनिधी**

**राज्य शासनाच्या पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, सांस्कृतिक कार्य विभागातर्फे 'महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा २०२४' चे आयोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील नोंदणीकृत संस्था किंवा परवानाधारक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी स्पर्धेत भाग घेण्यासाठी ३१ ऑगस्टपर्यंत ऑनलाइन अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी केले आहे.**



सांस्कृतिक कार्यक्रम, सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन, संस्कृतीचे जतन व संवर्धन याकरिता राबविण्यात आलेले उपक्रम, गडकिल्ले यांचे जतन व संवर्धन, राष्ट्रीय व राज्य स्मारके, धार्मिक स्थळे याविषयी जनजागृतीसह जतन व संवर्धन, विविध सामाजिक उपक्रम व कार्ये, पर्यावरणपूरक मूर्ती, पर्यावरणपूरक सजावट, ध्वनिप्रदूषणरहित वातावरण, गणेशभक्तासाठी केलेल्या सोयी सुविधा यांच्या आधारे केलेल्या कार्याचा गौरव व्हावा आणि असेच समाजाभिमुख उपक्रम अधिकाधिक घडावेत म्हणून प्रोत्साहनपर पुरस्कार देण्याचे शासनाचे उद्दिष्ट आहे. याच निकषांच्या आधारे स्पर्धेचे परीक्षण केले जाईल.

स्पर्धेचा अर्ज पु. ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबईच्या https://pldeshpandekalaacademy.org या संकेतस्थळावर उपलब्ध असून परिपूर्ण भरलेला अर्ज mahotsav.plda@gmil.com या ई-मेलवर ३१ ऑगस्टपर्यंत सादर करणे आवश्यक आहे. ७ सप्टेंबरपासून सुरू होणाऱ्या गणेशोत्सवात जिल्हाधिकारी कार्यालयांनी गठीत केलेली जिल्हास्तरीय समिती या स्पर्धेत सहभागी मंडळे किंवा संस्थांच्या उत्सवस्थळाला भेट देतील आणि जिल्हास्तरीय परीक्षण पूर्ण करतील. पुणे जिल्ह्यातून ३ शिफारसी राज्यस्तरीय परीक्षणासाठी पाठविल्या जातील.

राज्यस्तरीय पहिल्या क्रमांकास ५ लाख रुपये, द्वितीय क्रमांकास २ लाख ५० हजार रुपये आणि तृतीय क्रमांकास १ लाख रुपयांचे पारितोषिक व प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. तसेच अन्य जिल्हास्तरीय प्रथम विजेत्यांना २५ हजार रुपयांचे पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात येणार आहे. स्पर्धेच्या अधिक माहितीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा. जिल्ह्यातील जास्तीत जास्त सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवावा, असेही कळविण्यात आले आहे.






# निघोजमध्ये झावरे-वराळ पाटलांची दहीहंडी !

## ■ विधानसभेच्या पार्श्वभुमीवर राजकीय ध्रुवीकरण
## ■ निघोज गटात वर्चस्व मिळविण्यासाठी झावरेंची व्युहरचना

**निघोज : प्रतिनिधी**

**आगामी विधानसभा निवडणूकीच्या पार्श्वभुमीवर निघोजमध्ये जिल्हा परिषदेचे मा. उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील व संदीप पाटील वराळ जनसेवा फाउंडेशनचे अध्यक्ष सचिन वराळ यांनी एकत्र येत निघोजमध्ये फोडलेली दहीहंडी राजकीय जाणकारांच्या भुवया उंचावणारी ठरली आहे. निघोज गटामध्ये वराळांच्या मदतीने वर्चस्व मिळविण्यासाठी सुजित झावरे यांनी ही व्युहरचना केल्याचे मानले जात आहे.**

पारनेर तालुक्याच्या राजकारणात झावरे व वराळ ही कुटूंब गेल्या अनेक वर्षांपासून कार्यरत असून मध्यंतरीच्या काळात या दोन्ही कुटूंबात आलेला दुरावा या दहीहंडीच्या कार्यक्रमामुळे संपुष्टात आला आहे. झावरे आणि वराळ यांचे मनोमिलन घडवून आणण्यासाठी पंकज कारखिले, अरूण ठाणगे, अमोल साळवे, बाळासाहेब माळी, ज्ञानेश्वर वरखडे, निवृत्ती वरखडे यांनी पुढाकार घेत यशस्वी मध्यस्ती घडवून आणली.

निघोजचे मा. सरपंच स्व. संदीप पाटील वराळ व सुजित झावरे यांची मैत्री सर्वश्रुत होती. बाजार समितीचे उपसभापतीपद संदीप वराळ यांना देऊन सुजित झावरे यांनी बेरजेचे राजकारण त्या काळात केले होते. काळाच्या ओघात सुजित पाटील व सचिन पाटील यांच्या जरी मनभेद झाले असले तरी कार्यकर्त्यांच्याच आग्रहाखातर दोघे एकत्र आल्याने दोन्ही नेत्यांच्या कार्यकर्त्यांमध्ये या कार्यक्रमात उत्साह दिसून आला.



■ निघोज येथे आयोजित करण्यात आलेल्या दहीहंडी कायक्रमात सुजित झावरे पाटील यांनी उपस्थितांशी संवाद साधला.

### एक कोटी निधी देणार !

माझ्याकडे सध्या कोणतेही पद नाही. मी अगदी ग्रामपंचायत सदस्यही नाही. अशा स्थितीतध्ये सचिन वराळ पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी सभामंडप, रस्ते व इतर अशा ७५ लाख रूपयांच्या कामांची मागणी केली आहे. मागणी ७५ लाख रूपयांची असली तरी आपण एक कोटी रूपयांचा निधी देऊन लवकरच या कामांचा शुभारंभ करणार आहोत.

**सुजित झावरे पाटील**
मा. उपाध्यक्ष, जि. प. नगर

### झाल्या तिन्ही सांजा !

रसिक असलेल्या सुजित झावरे पाटील यांनी दहीहंडीच्या या कार्यक्रमात कार्यकर्त्यांच्या आग्रहाखातर त्यांच्या आवडीचे झाल्या तिन्ही सांजा हे गाणे गायले. त्यांच्या या सादरीकरणास उपस्थितांनी उस्फुर्त दाद दिली.

# पोद्दार स्कूलच्या ग्रंथालयास स्पर्धा परीक्षेच्या पुस्तकांचे दान

## मालतीबाई गायकवाड यांच्या स्मृती दिनानिमित्त उपक्रम

**पारनेर : प्रतिनिधी**

**समाज सुधारकांच्या क्रांतिकारी विचारांनी प्रेरित होऊन व शिक्षित जन्म दात्यांच्या सुसंस्करात वाढलेल्या जिल्हा परिषद अहमदनगर येथे प्रशासकीय सेवेतून सेवानिवृत्त झालेले बाळासाहेब गायकवाड व पत्रकार भगवान गायकवाड यांनी त्यांच्या मातोश्री कालकथित मालतीबाई गायकवाड यांच्या प्रथम पुण्यस्मरण दिनानिमित्त पारनेर शहरातील पोदार स्कूलच्या विद्यार्थ्यांसाठी ग्रंथालयास १० हजार रुपयांची जवळपास २५० पुस्तके दान केली.**

या कार्यक्रम प्रसंगी ज्येष्ठ पत्रकार मार्तंडराव बुचुडे, पोद्दार स्कूलचे अध्यक्ष रामराव गाडेकर , सचिव मच्छिंद्र मते, प्राचार्य विठ्ठल तुपे,पारनेर तालुका पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष उदय शेरकर, कार्यकारणी सदस्य विनोद गोळे, किरण शिंदे, शशिकांत भालेकर, संतोष सोबले, सुरेंद्र शिंदे, सामाजिक कार्यकर्ते आशीष गायकवाड,आदी मान्यवर उपस्थित होते.

सामाजिक बांधिलकी जपत असताना जपण्याच्या आगळावेगळा उपक्रमाचं बाळासाहेब गायकवाड समाजात जीवन जगत असताना प्रत्येक माणूस कोणत्या ना कोणत्या स्वरूपात दान करतो. दानाचे विवीध प्रकार आहेत. आज घडीला सर्वत्र गुप्त दान मोठ्या प्रमाणावर केले जाते. जेथे ज्ञानाचा सागर संचित करून इतरांची वैचारिक भूक भागविली जाते. त्या चार भिंतीच्या असलेल्या ग्रंथालयाच्या वाचनालया मुळे भविष्यात होणाऱ्या फायद्याने विद्यार्थ्यांचे जीवन फुलते हाच आशीर्वाद बाळगून बाळासाहेब गायकवाड यांनी आपले सामाजिक दायित्व पार पाडले.

महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर, क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले यांच्या विचारांचा पगडा बाळासाहेब गायकवाड यांच्यावर सुरवाती पासूनच आहे. तुमच्याकडे दहा रुपये असतील तर पाच रूपयात आपली गरज भागवा उर्वरित पाच रुपया मधून आपल्या मुलंबाळांसाठी पुस्तक विकत घ्या. असा मौलिक संदेश डॉ.बाबासाहेब आंबेडकर देत असत. जो वाचणार नाही तो वाचू शकणार नाही या विचारांचा तंतोतंत अंगीकार बाळासाहेब गायकवाड यांनी केला. त्यांनी या स्कूलसाठी विविध स्पर्धा मार्गदर्शन पुस्तके एकूण दहा हजारांची उदार मनाने त्यांचें मातोश्री मालतीबाई गायकवाड यांच्या प्रथम पुण्यस्मरण दिनानिमित्त पोदार स्कूलच्या विद्यार्थ्यांसाठी ग्रंथालयास दान केली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रामराव गाडेकर यांनी केले तर मच्छिंद्र मते यांनी आभार मानले.



### आदर्शवत कार्य

गायकवाड परिवाराने विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा मार्गदर्शन पुस्तके दान करून समाजात एक आदर्शवत कार्य केले आहे.

**मार्तंडराव बुचुडे,** पत्रकार

### अण्णा हजारेंचा वारसा

पारनेर तालुक्यात ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांचा वारसा असल्याने तालुक्यात विविध सामजिक उपक्रम राबविले जातात.

**विनोद गोळे,** पत्रकार

### स्पर्धा परिक्षांसाठी मदत

या अभिनव उपक्रम राबविल्या मुळे पोद्दार स्कूलच्या विद्यार्थ्यांना भविष्यात स्पर्धा परीक्षासाठी मोठी मदत होईल.

**उदय शेरकर,** पत्रकार

# उत्तम आरोग्यासाठी मैदानी खेळात सहभाग आवश्यक

## प्रा.संजय धोपावकर यांचे प्रतिपादन



**पारनेर : प्रतिनिधी**

**विद्यार्थ्यांना खेळांमध्ये सक्रियपणे सहभागी होण्यासाठी मेजर ध्यानचंद यांच्या क्रीडा क्षेत्रातील योगदानातून प्रेरणा मिळेल असे प्रतिपादन प्रा. संजय धोपावकर यांनी केले.**

पारनेर येथील न्यू आर्टस्, कॉमर्स अण्ड सायन्स महाविद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले यांप्रसंगी ते बोलत होते.

प्रा. संजय धोपावकर पुढे म्हणाले, २९ ऑगस्ट हा दिवस भारतात राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून साजरा केला जातो. हॉकीचे जादूगार म्हटल्या जाणाऱ्या मेजर ध्यानचंद यांची जयंती राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून साजरी केली जाते. हॉकी हा भारत देशाचा राष्ट्रीय खेळ आहे. हॉकी या खेळाचा भारताने जगात दबदबा निर्माण केला आहे. असे भारतीय हॉकीतील नव्हे तर हॉकी विश्वातील सर्वात महान खेळाडू मेजर ध्यानचंद सिंह हे हॉकीचे जादूगार म्हणून संबंध जगात ओळखले जातात. हॉकीमधील त्यांचे कार्य एवढे मोठे होते की, जर ते मैदानावर खेळत असले तर चेंडू लोहचिबंकाप्रमाणे त्यांच्या स्टिककडे आकर्षित व्हायचा, त्यांच्या काळात भारतीय संघ सर्वात शक्तिशाली संघ म्हणून ओळखला जायचा. यांप्रसंगी प्राचार्य डॉ लक्ष्मणराव मतकर म्हणाले, आपली भारतीय युवा पिढी प्रतिकुल परिस्थितीवर मात करत आपल्या जिद्दीच्या, प्रचंड मेहनतीच्या जोरावर अनेक खेळ प्रकारात भारताचे नाव उंचावत आहे. भारतात अनेक हिरे आहेत जे आपल्या कौशल्याच्या जोरावर इतिहास घडवत आहेत.

यांप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. तुकाराम थोपटे, दादा पाटील राजळे महाविद्यालयाचे डॉ. रोहित आदलिंग, सुप्रसिद्ध कवी व गीतकार बाबासाहेब सौदागर, पारनेर तालुका पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष पत्रकार मार्तंडराव बुचुडे, शशिकांत भालेकर, संतोष सोबले आदी पत्रकार उपस्थित होते. तसेच विद्यार्थी विकास अधिकारी डॉ रवींद्र देशमुख, डॉ. दीपक सोनटक्के, डॉ. नंदकुमार उदार, प्रा. नितीन निपुंगे आदी प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार डॉ. संजय गायकवाड यांनी मानले.

# मेजर ध्यानचंद हे भारतीय क्रीडा विश्वाचे प्रतिकच!

## उपप्राचार्य प्रा. अर्जुन चाटे यांचे प्रतिपादन




**अळकुटी : प्रतिनिधी**

**मेजर ध्यानचंद यांनी स्वातंत्र्यपूर्व काळात भारतीय क्रीडा विश्वात खेळाडू म्हणून कार्य करण्यास सुरुवात केली. राष्ट्रभक्तीने प्रेरित असलेल्या ध्यानचंद यांनी भारतास जागतिक पातळीवर नावलौकिक मिळवून देण्याचे मनोमन ठरवले व त्यातूनच त्यांनी भारतास ऑलिम्पिक सारख्या जागतिक क्रीडा स्पर्धेत हॉकी या खेळात सलग तीन वेळा सुवर्णपदक प्राप्त करून देण्यात मोलाचा वाटा उचलला आहे. म्हणूनच ते क्रीडा विश्वाचे प्रतिक असल्याचे प्रतिपादन महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.अर्जुन चाटे यांनी केले.**

लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अळकुटी येथे पद्मभूषण मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यांप्रसंगी प्रा. अर्जुन चाटे अध्यक्षस्थानाहून बोलताना म्हणाले की, राष्ट्रीय क्रीडा दिन हा भारतीय क्रीडा विश्वाचा उत्सवच आहे. असे मत व्यक्त केले.

यांप्रसंगी प्रा. संजय जाधव, प्रा. शर्मिष्ठा बोरूडे, डॉ. कुंदा कवडे, प्रा. स्वाती फापाळे, प्रा. दत्तात्रय शेळके, प्रा. दशरथ पानमंद, प्रा. प्रियांका दिवटे, प्रा. सुनिता जाधव, प्रा. पोपट सुंबरे, प्रा. मच्छिंद्र बेलोटे, प्रा. शिवाजी शेळके, प्रा. विशाल रोकडे, डॉ. शांताबाई थोरात, प्रा. रावसाहेब झावरे, प्रा. संदीप गेटम, प्रा. मोहन माने, प्रा. सुषमा करकंडे, प्रा. ऋषिकेश गिते, प्रा. सुप्रिया पारखे, प्रा. अमोल नालकर, प्रा. पूजा वैरागर, प्रा. पांडुरंग उघडे, प्रा. अनुराधा गाढवे, सूर्यमाला भोर,गोरख घोलप, सुनिता भालेराव,विकास सोनवणे, छाया म्हस्के, राहुल बोरूडे, सागर शितोळे, मनोहर कनिंगध्वज, मच्छिन्द्र म्हस्कुले, रवींद्र वाघ तसेच सर्व प्राध्यापक प्राध्यापकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यांप्रसंगी क्रीडा विभागप्रमुख प्रा. राजाराम गोर्डे यांनी प्रास्ताविक केले तर नितीन घोलप यांनी आभार मानले.

# कोरडे दादा आमदार होणार!

## राजेश गोपाळे यांना ठाम विश्वास

**गुणोरे : प्रतिनिधी**

**पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघ हा विकास कामांना साथ देणारा मतदारसंघ असून कार्यक्षम व अभ्यासू व्यक्तिमत्व म्हणून परिचित असलेले भाजपाच्या राज्य कार्यकारणीचे सदस्य विश्वनाथ कोरडे हे यंदाच्या विधानसभा निवडणूकीत विजयी होऊन आमदार म्हणून विधानसभेत जातील असा विश्वास कोरडे यांचे कट्टर समर्थक राजेश गोपाळे यांनी व्यक्त केला.**




विश्वनाथ कोरडे यांच्या वाढदिवसानिमित्त जवळे येथील त्यांच्या निवासस्थानी आयोजित अभिष्टचिंतन कार्यक्रमात जनसमृध्दी पतसंस्थेच्या वतीने चेअरमन मच्छिंद्र मेसे, सोसायटीचे उपाध्यक्ष बन्सी बढे, मनोहर राऊत, विलास हारदे, मोहनशेठ खराडे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला, त्यावेळी गोपाळे यांनी कोरडे यांना आमदार होण्याची मोठी संधी असल्याचे सांगितले.

गोपाळे म्हणाले, गेल्या पंधरा वर्षांपासून पारनेर तालुक्यात काम करताना जिल्हा परीषदेचे सदस्य, भाजपाच्या राज्य कार्यकारणीचे सदस्य म्हणून काम करताना मोठया प्रमाणावर विकास कामे मार्गी लावली आहेत. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, चंद्रशेखर बावनकुळे, प्रा. राम शिंदे, यांच्यासह भाजपाच्या इतर नेतृत्वाकडे विकास कामांचा शब्द टाकल्यानंतर तो पुर्ण करण्याची जबाबदारी हे नेते घेतात. एक कामाचा माणूस म्हणून कोरडे हे परिचित असून सर्व क्षेत्रात आघाडीवर असलेल्या विश्वनाथ दादा यांना भाजपाने उमेदवारी द्यावी, ते दिलेल्या संधीचे सोने करून पारनेर तालुक्याचे नेतृत्व विधानसभेत करतील असा विश्वास गोपाळे यांनी व्यक्त केला.

यावेळी रवि रणसिंग, संदेश घोगरे, पांडूरंग बढे, असिफभाई इनामदार, यादवराव गोपाळे, बाळासाहेब गोपाळे, प्रभाकर बढे, संदीप ढवळे यांच्यासह निघोज, जवळा, गुणोरे, गाडीलगांव परिसरातील पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ उपस्थित होते.

# स्व.उषादेवी खिलारींनी एकत्रित कुटुंबाची घडी बसविली

## ■ माजी आमदार सुधीर तांबे यांचे प्रतिपादन ■ विविध मान्यवरांकडून श्रद्धांजली अर्पण

**टाकळी ढोकेश्वर : प्रतिनिधी**

**टाकळी ढोकेश्वर येथील खिलारी कुटुंबाचे सामाजिक शैक्षणिक राजकीय क्षेत्रामध्ये जिल्ह्यात व तालुक्यात मोठे योगदान राहिले आहे. ज्येष्ठ मार्गदर्शक सिताराम खिलारी सर यांनी समाजासाठी मोठे काम केले आहे. त्यांच्या या जीवन प्रवासात त्यांना साथ देणाऱ्या व कुटुंबाची घडी बसविणाऱ्या त्यांच्या अर्धांगिनी उषादेवी खिलारी यांचे निधन झाल्याने भरून न निघणारी हानी खिलारी कुटुंबाची टाकळी ढोकेश्वर परिसराची हानी झाली आहे. उषादेवी यांनी त्यांच्या कुटुंबातील सदस्यांवर चांगले संस्कार केले. कुटुंबाला एकत्र बांधून ठेवत सर्वांवर त्यांनी प्रेम केले. अशा या मातोश्रींना सर्व उपस्थितांच्या वतीने व माझ्या तांबे परिवाराच्यावतीने भावपूर्ण श्रद्धांजली असे मत संगमनेर येथील नाशिक विभागीय शिक्षक मतदार संघाचे माजी आमदार सुधीर तांबे यांनी व्यक्त केले.**

अहमदनगर जिल्हा मराठा शिक्षण संस्थेचे ज्येष्ठ विश्वस्त सिताराम खिलारी यांच्या पत्नी, सावली हॉस्पिटलचे डॉ. भाऊसाहेब खिलारी, टाकळी ढोकेश्वरचे माजी सरपंच शिवाजी खिलारी यांच्या मातोश्री व पारनेर खरेदी विक्री संघाचे चेअरमन ॲड. बाबासाहेब खिलारी यांच्या चुलती उषादेवी खिलारी यांच्या दशक्रियाविधी निमित्ताने टाकळी ढोकेश्वर येथे श्रद्धांजलीपर माजी आमदार तांबे बोलत होते. यावेळी नगर जिल्ह्यातील शैक्षणिक सामाजिक सांस्कृतिक धार्मिक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.



यावेळी सुजित झावरे पाटील, काशिनाथ दाते, माधवराव लामखडे, विश्वनाथ कोरडे, राहुल शिंदे, नानासाहेब शिंदे, लहानु गुंजाळ, बापूसाहेब गुंड, अशोक फडके, रावसाहेब रोहकले, मुकेश मुळे, शिवाजी शिर्के, नितीन अडसूळ, सुरेश पठारे, शारदाताई शिंदे, डॉ. भास्करराव शिरोळे, सचिन वराळ, गंगाराम बेलकर, मारुती रेपाळे, प्रा. भास्करराव झावरे, प्राचार्य रंगनाथ आहेर, प्राचार्य लक्ष्मण मतकर, अरुणाताई खिलारी, रामभाऊ तराळ, नारायण झावरे, व्हा. मोहन रांधवन, बाळासाहेब खिलारी, भाऊसाहेब लोंढे, विलास झावरे, मनोज मुंगसे, बा. ठ. झावरे, जालिंदर वाबळे, माजी सरपंच भाऊसाहेब शिंदे, प्रकाश राठोड, राजेंद्र चौधरी, ॲड. अशोक शेळके, डॉ. दिपक आहेर, डॉ. जयवंत निमसे, डॉ. विजय पुरी, डॉ. विलास नवले, डॉ. संदीप बर्वे, डॉ. दत्तात्रय दातीर, डॉ. मंगेश वाळुंज, डॉ. विनायक दातीर, डॉ. संतोष वाळुंज, डॉ. मारुती रांधवन, डॉ. अतुल बांडे, डॉ. रवींद्र झावरे, डॉ. संजय बांडे,डॉ. मुकेश ठुबे, डॉ. महेश ठुबे, डॉ. राधाकृष्ण ठुबे, डॉ. नितीन रांधवण, सुधीर जासूद, दत्तप्रसाद सोनावळे, संजय झावरे, अशोक वाळुंज, बबन बांडे, गणेश चव्हाण, गंगाधर धावडे, अमोल झावरे, आदिनाथ दातीर, किसन धुमाळ, मंगेश खिलारी, आदी. खिलारी कुटुंबातील नातेवाईक सिताराम खिलारी यांचे जुने सहकारी पारनेर तालुका मेडिकल असोसिएशनचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

# राजे यांची सामाजिक बांधिलकी प्रेरणादायी - ज्ञानदेव लंके

## रमीज राजे यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर

**पारनेर : प्रतिनिधी**

**वाढदिवसानिमित्त होणाऱ्या वायफळ खर्चाला फाटा देऊन रक्तदान शिबिराचे दरवर्षी आयोजन करून युवा नेते रमीज राजे हे आपले सामाजिक दायित्व पार पाडत आहेत. त्यांची सामाजिक बांधिलकी तरूण पिढीसाठी प्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन निवृत्त शिक्षक ज्ञानदेव लंके यांनी केले.**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे पारनेर शहराध्यक्ष रमीज राजे यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर व खा. नीलेश लंके यांच्या वहीतुला कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचा शुभारंभ ज्ञानदेव लंके यांच्या हस्ते करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते.

लंके म्हणाले, वाढदिवसानिमित्त सामाजिक उपक्रम राबविणे ही अतिशय स्तुत्य गोष्ट आहे. आपल्या आनंदाच्या क्षणी समाजातील गरीब, दुर्लक्षीत घटकांचा विचार करून त्यांचे सामाजिक काम उत्कृष्टपणे सुरू आहे. भोसरी येथील संजीवनी ब्लड बँकेच्या सहकार्याने डॉ. दत्तात्रेय येवले व त्यांच्या टीमने रक्तदान शिबिर यशस्वी केले. चाळीस रक्तदात्यांनी रक्तदान केले. रमीज राजे यांनी स्वतः रक्तदान करीत या शिबिराचा शुभारंभ केला. वाढदिवसाचे औचित्य साधून राजे परिवाराच्या मस्का चाय या दालनाचाही शुभारंभ करण्यात आला.

या प्रसंगी दीपक लंके, अर्जुन भालेकर, डॉ. बाळासाहेब कावरे, योगेश मते, भुषण शेलार, सलिम राजे, राजू शेख, सादीक राजे, नसिर शेख, आनंदा औटी, विलास सोबले, शकील सय्यद, शकील शेख, सियाज राजे, अकिल सय्यद, पाकीजा शेख, अजीम शेख, संदीप चौधरी, अमित जाधव, वैभव गायकवाड, बबलू राजे, पंकज आहेर, नुर कुरेशी, तौफिक पटेल, रफीक शेख, असिफ मोमीन, असिर शेख, राजू तराळ, विजय तराळ, सचिन पठारे, विजय डोळ, बलभीम कुबडे, अन्वर शेख, रा. या.औटी आदी यावेळी उपस्थित होते.



'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com